भोवताली नजर टाकली की
धावपळींचीच वावटळ दिसते.
आजूबाजूला कान लावला की
बडबडींची गडबड असते.

मी शांततेच्या दीर्घ शोधात
धावपळीत आणि गडबडीत,
मी अंतर्मुख माझ्याच कोषात,
बंदिस्त होऊन मनाच्या आकाशात.

७.१.२०१९